**प्रेसनोट** **दि.१९/०७/२०१९**

## बबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

## तडीपास आरोपीस ठोकल्या बेड्या

दि.१८/०७/२०१९ रोजी बिबवेवाडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री काळे व कर्मचारी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे साो यांचे आदेशान्वये बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई रोहित शिंदे यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, बिबवेवाडी पोलीस ठाणे रेकॉर्डवरील तडीपार आरोपी नामे सनि संतोष भरगुडे हा योगायोग सोसायटी समोरील सार्वजनिक रोडवर हातात लोखंडी कोयता घेवुन दहशत करीत आहे. अशी बातमी मिळाल्याने पो.शि.रोहित शिंदे यांनी लागलीच पोलीस उप निरीक्षक श्री काळे यांना कळवुन सदर ठिकाणी स्टाफसह जावुन ते ओखळत असलेला नमुद आरोपी हा त्याचे तडीपार काळात बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत हातामध्ये लोखंडी कोयता घेवुन चालत येत असल्याचे दिसल्याने त्यांनी त्यांचा पाठलाग करुन थोडयाच अंतरावरुन ताब्यात घेवुन त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचेकडे चौकशी करुन त्याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस ठाणेस महाराष्ट्र पोलीस अधिनियम १४२, ३७(१) सह १३५ व आर्म ॲक्ट ४(२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक श्री काळे, पोलीस हवालदार चिप्पा, पोलीस शिपाई रोहित शिंदे, लोधा, कुलकर्णी यांनी केली आहे.

